महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२१/ २५०४ दिनांक: 21 SEP 2021

कालमर्यादित/अत्यंत महत्वाचे

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित,
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

**विषय: - भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे "आजादी का अमृतमहोत्सव" या उपक्रमासाठी औरंगाबाद विभागात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या तपशीलाबाबत...**

संदर्भ: १ मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण/८२२१/प्रक्र१७२(भाग ३)/सांका-४, दि.१७/०८/२०२१.
२ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/संकीर्ण/२०२१/ २७३, दि. १३/०९/२०२१.

उपरोक्त विषयान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत सर्व अधिनस्त संस्थांनी "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या कार्यक्रमातंर्गत विविध उपक्रम दि. १५/०८/२०२२ पर्यंत राबवायचे आहेत आणि तद्नंतर सन २०२३ पर्यंत "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या संकल्पनेची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने उपक्रम सुरु ठेवायचे आहेत. सदर उपक्रम राबवितांना प्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या कोविड विषयक सुरक्षा नियमांची अनुपालन होईल याची दक्षता सर्व संस्थांनी घ्यावयाची आहे.

"भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" (आजादी का अमृतमहोत्सव) अंतर्गत औरंगाबाद विभागातील सर्व संस्थांनी खालील कार्यक्रम/उपक्रम राबवावे तसेच घेतलेल्या कार्यक्रमांचा अहवाल, फोटो व चलचित्रांच्या माध्यमातून या कार्यालयास दिलेल्या कालमर्यादेत सादर करावा.

**"भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" (आजादी का अमृतमहोत्सव) अंतर्गत औरंगाबाद विभागातील प्रायोजित कार्यक्रम/उपक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रम/उपक्रम | कार्यक्रम/उपक्रमाचा तपशील | सहभागी होणाऱ्या संस्थांचे नाव | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | **विभागस्तरीय प्रोजेक्ट एक्झिबिशन** | विभागीय सहसंचालकांमार्फत विभागीय स्तरावर विभागस्तरीय प्रोजेक्ट एक्झिबिशनसाठी समन्वय समिती गठीत करण्यात येईल. सदर समितीमार्फत विभागातील तंत्रशिक्षण संस्थांमधील विद्यार्थ्यांची प्रोजेक्ट कॉम्पिटिशन आयोजित करण्यात येईल. यामध्ये सर्वोत्कृष्ट असलेल्या २० ते २५ प्रकल्पांचे प्रदर्शन देखील ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात येईल. प्रकल्पांचे विषय हे संबंधित विभागातील स्थानिक समस्या, प्रगत तंत्रज्ञान, महत्वपूर्ण तांत्रिक संकल्पना इ. बाबींशी निगडीत असतील. सर्वोत्कृष्ट ३ प्रकल्पांना विभागीय स्तरावर पारितोषिक व प्रशास्तीपत्र देण्यात येईल. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | दि. ३०/११/२०२१ पर्यंत. |
| २ | **विभागस्तरीय कॉन्फरन्स** | सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत वर्षभरात किमान दोन कॉन्फरन्स आयोजित करण्यात येतील. या कॉन्फरन्समध्ये स्थानिक औद्योगिक आस्थापनांना देखील सहभागी करून घेण्यात येईल. कॉन्फरन्समधील विषय हे तांत्रिक तसेच आर्थिक व सामाजिक विषयांशी निगडीत असतील. उदा. आर्थिक साक्षरता, स्वच्छ पेयजल, प्रदूषण इ. | या विभागातील निवडक शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | दि. ३०/०९/२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | विभागस्तरीय शोधनिबंध स्पर्धा | विभागातील संस्थांनी विद्यार्थ्यांचे टेक्निकल रिसर्च पेपर रायटींग (शोध निबंध स्पर्धा) स्पर्धा आयोजित करावी. सदर स्पधेतील सर्वोत्कृष्ट तीन शोध निबंधांना पारितोषिक व प्रशस्तीपत्र संस्थास्तरावर दयावेत. अतांत्रिक विषयांसाठी स्वतंत्रपणे निबंध स्पर्धा देखील संस्थांनी आयोजित करावी. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | सप्टेंबर-२०२२ पर्यंत. वर्षभरातून किमान दोन वेळा या स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे. |
| ४ | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत - परिसर साफसफाई उपक्रम | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांच्या अधिनस्त संस्थांनी प्रत्येक महिन्यात एक दिवस निश्चित करुन स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कार्यालय आणि परिसराची साफसफाई करावी. हा उपक्रम डिसेंबर, २०२२ पर्यंत राबविण्यात यावा तसेच तद्नंतर आवश्यकतेनुसार कालावधी वाढविण्यात येईल. या उपक्रमामध्ये सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग आवश्यक आहे. तसेच महाविद्यालयीन वर्ग नियमितपणे सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याचा देखिल सहभाग आवश्यक आहे. परिसराची उत्कृष्ट साफसफाई राखणाऱ्या संस्था/ कार्यालयास पारितोषिक प्रशस्तीपत्र देण्यात येईल. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | डिसेंबर, २०२२ |
| ५ | विभागस्तरीय ग्रीन कॅम्पस (हरित कॅम्पस) स्पर्धा | या स्पर्धेत भाग घेणाऱ्या संस्थांनी त्यांच्या परिसरातील कार्बन उत्सर्जन, सांडपाण्याची, कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट, वॉटर री सायकलिंग, सौर ऊर्जेचा वापर, वीज बचत करणारी यंत्रणा, जलसंधारण, बायो टॉयटेलचा वापर इत्यादींचे अनुषंगाने निकष तयार करून ते प्रसिद्ध करावेत. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांतर्फे संस्थांची ग्रीन कॅम्पस (हरित कॅम्पस) स्पर्धा आयोजित करण्यात येईल. व स्पधेसाठी संस्थांकडून प्रस्ताव मागविले जातील. प्राप्त प्रस्तावांची तज्ज्ञ समितीमार्फत छाननी कॅम्पसची प्रत्यक्ष पाहणी करुन सर्वोत्कृष्ट ३ अंतिम विजेत्या प्रस्तावांची निवड करण्यात येईल. सर्वोत्कृष्ट ३ प्रस्तावांना विभागीय स्तरावर पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येईल. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | दि. ३०/०३/२०२२ |
| ६ | विभागस्तरीय- विविध सामाजिक उपक्रम राबविणे | या विभागातील तंत्रशिक्षण संस्थांनी वृक्ष लागवड, रक्तदान शिबीर, कोविड बाबत जनजागृती अभियान इ. प्रकारचे उपक्रम प्रत्येक महिन्यात किमान एक या प्रमाणे राबवावा. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | दि. ३१/१२/२०२२ |
| ७ | राज्य स्तरीय हेकाथॉन स्पर्धा | समाजातील दैनंदिन जीवनात येणाऱ्या पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करुन नावीन्यपुर्ण तोडगा काढणे हा उपक्रमाचा उद्देश आहे. हा उपक्रम स्मार्ट इंडिया हकेथॉनच्या स्वरूपावर आधारित आयोजित करण्यात येईल. विविध सरकारी विभाग, उद्योग आणि विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडून समस्या बाबत निवेदने आमंत्रित करुन त्यावर तंत्रज्ञानचा वापर करुन नावीन्यपुर्ण उपाय सुचविण्यासाठी स्पर्धा आयोजित केली जाईल. हा उपक्रम दोन टप्प्यात राबविला जाईल. टप्पा १- आयडिया जनरेशन. टप्पा २- हेकाथॉन<br>**टप्पा १- आयडिया जनरेशन**<br>हा उपक्रम खालील पद्धतीने राबविण्यात येईल.<br>१. या उपक्रमासाठी तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे हे समन्वय आणि संयोजनाचे काम पाहतील. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | दि. ३१/०३/२०२२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | त्यांच्या कार्यालयातर्फे, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली या साठी राज्य स्तरीय समिती गठीत करण्यात येईल.<br>२. राज्य स्तरीय समिती मार्फत स्पर्धेचे व स्पर्धेत आमंत्रित करावयाच्या "प्रॉब्लेम स्टेटमेंट" इत्यादी निकष ठरविले जातील.<br>३. तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे हे निकष व अनुषंगिक तपशील सर्व विभागीय कार्यालयांना कळवतील.<br>४. विभागीय कार्यालये त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, छोटे उद्योग, स्वयंसेवी संस्था यांचेकडून "प्रॉब्लेम स्टेटमेंट" आमंत्रित करतील. यासाठी साधारणत: ४ आठवडे कालावधी अपेक्षित आहे. त्यानंतर या "प्रॉब्लेम स्टेटमेंट" चे विभाग स्तरावर संकलन करुन, ते राज्य स्तरीय समितीस २ आठवडयाचे कालावधीत सादर करतील.<br>**टप्पा २- हेकाथॉन**<br>१. तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या तर्फे, प्राप्त झालेल्या प्रॉब्लेम स्टेटमेंटची व्याप्ती आणि त्याचा समाजिक / आर्थिक फायदा, प्रशासनास उपयुक्तता इत्यादींच्या अनुषंगाने तपासणी करुन तसेच पुनरावृत्ती टाळून अंतिम यादी समितीमार्फत निश्चित करण्यात येईल व सर्व विभागीय कार्यालयांना हेकाथॉन स्पर्धेसाठी पाठविण्यात येईल.<br>२. या प्रमाणे अंतिम केलेल्या यादीतील "प्रॉब्लेम स्टेटमेंट" वर विभागीय स्तरावर हेकाथॉन स्पर्धेद्वारे तंत्रज्ञानाचा वापर करून नावीन्यपूर्ण उपाय आमंत्रित करण्यात येतील. प्रस्ताव आमंत्रित करताना इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर तसेच प्रसिद्धीसाठी विभागातील तंत्र शिक्षण संस्था यांची मदत घेण्यात येईल. विभागीय कार्यालयाच्या क्षेत्रातील एनजीओ, औद्यागिक आस्थापना, स्वयंसेवी संघटना, तंत्रशिक्षण संस्था तसेच शाळा, महाविद्यालये येथील विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण उपाय योजना (Innovative solution) बाबत प्रस्ताव मागविण्यात येतील.<br>३. सर्वोत्कृष्ट तीन प्रस्तावांना विभागीय स्तरावर पारितोषिक व प्रशस्तीपत्र देण्यात येईल. तसेच निवडक प्रस्तावांचे विभागीय स्तरावर सादरीकरण करुन अंतिम विजेते घोषित करण्यात येतील.<br>४. तद्नंतर प्रत्येक विभागातील सर्वोत्कृष्ट ३ प्रस्ताव राज्यस्तरीय सादरीकरणासाठी आमंत्रित केले जातील. प्रस्तावांचे राज्य स्तरावर सादरीकरण व अंतिम विजेते घोषित करण्यात येतील. | | |
| ८ | **राज्य स्तरीय "डिजिटल साक्षरता अभियान" - तंत्र शिक्षण संचालनालया अंतर्गत संस्थांद्वारे सामान्य नागरीकांसाठी** | केंद्र शासनाने प्रत्येक घरात किमान एक व्यक्ती डिजिटल साक्षरता कौशल्यांसह साक्षर असावी या उद्देशाने राष्ट्रीय डिजिटल साक्षरता मिशन ही योजना सुरु केली आहे. तांत्रिक साक्षरता असलेल्या प्रौढांना वाढत्या डिजिटल जगात संवाद साधण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यात मदत करणे हा या प्रकल्पाचा हेतू आहे. डिजिटल साक्षरतेमध्ये माहिती निवडण्याची क्षमता; ई-सुरक्षा इत्यादी बाबींचा समावेश आहे. | या विभागातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था | डिसेंबर - २०२१ पासून निरंतर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **"डिजिटल साक्षरता अभियान" राबविणे** ( Each One-Teach One) | **अंमलबजावणी:-** उच्च तंत्र शिक्षण विभागाचे नेतृत्वाखाली राज्यातील सर्व तंत्र शिक्षण संस्था (विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी) यांचे सहभागाने डिजिटल साक्षरता मिशन राबविण्यात येईल.<br>**टप्पा १)** यासाठी केंद्र शासनाने राज्यात मिशन राबविण्याची जबाबदारी सोपविलेल्या राज्य सेतू सोसायटी (माहिती व तंत्रज्ञान विभाग) यांचेशी समन्वय साधून "ट्रेन द ट्रेनर" प्रशिक्षणाद्वारे प्रशिक्षकांची प्रथम बॅच तयार करण्यात येईल.<br>**टप्पा २)** तद्नंतर संचालनालया अंतर्गत विभागीय कार्यालये आणि संस्था यांचेकडून प्रशिक्षकांचे पुढील प्रशिक्षण केले जाईल.<br>**टप्पा ३)** तद्नंतर विविध शासकीय / निमशासकीय कार्यालये येथे सदर मिशन तंत्र शिक्षण संस्थामार्फत राबविले जाईल.<br>**टप्पा ४)** त्यानंतर हे अभियान समाजातील इतर घटकांसाठी राबविले जाईल. मात्र टप्पा ३ सुरु असताना निश्चित अंतराने (प्रति माह किंवा प्रति सप्ताह) तंत्र शिक्षण संस्थांमध्ये हे अभियान मर्यादित क्षमतेने इतर घटकांसाठी उदा. महिला बचत गट, एखाद्या आस्थापनेतील अकुशल कामगार इत्यादींसाठी देखील समांतरपणे राबविण्यात येईल.<br>तसेच हा उपक्रम राबविताना त्यात खालील प्रमाणे प्रशिक्षण देखील समाविष्ट करता येईल:<br>१) आपले सरकार पोर्टल व त्याद्वारे नागरिकांना मिळणाच्या सुविधा, डिजिटल सात बारा, वाहन अनुज्ञप्ती, आधार संलग्न सेवा<br>२) ऑनलाईन पद्धतीने देयके अदा करण्याची सुविधा उपलब्ध असणाऱ्या विविध यंत्रणा- स्वयंपाकाचा गॅस, टेलिफोन, वीज देयक, मालमत्ता कर, आय कर इत्यादी<br>३) Apps ची संकल्पना, वापर करताना घ्यावयाची खबरदारी<br>४) ऑनलाईन बँकिंग, एस एम एस सुविधेचे महत्व, टु फॅक्टर ऑथोरायझेशनचे महत्व.<br>५) हॅकिंग, इमेल एस एम एस द्वारे होणारे गुन्हे व त्यासंदर्भात घ्यावयाची खबरदारी | | |

याअनुषंगाने उपरोक्त तक्त्यामधील उपक्रम आपल्या संस्थेत यशस्वीरित्या राबविण्यात यावेत व आपल्या संस्थेचा उपरोक्त उपक्रमांत संपुर्ण सहभाग राहील, याची दक्षता घ्यावी, सदर कार्यक्रमांसाठी शासकीय पत्रव्यवहार व पोर्टल इत्यादींवर अमृत महोत्सवी भारताचा लोगो व घोषवाक्य देण्यात यावे. सदर उपक्रमांतील विविध कार्यक्रमांसाठी आपल्या संस्थेच्या सहभागाबाबत माहिती सादर करण्यासाठी या कार्यालयाकडून गुगल फॉर्म / एक्सेल शीट मध्ये आपणास ईमेलद्वारे लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच सदर उपक्रमांचा आढावा शासनाकडून वेळोवेळी घेण्यात येणार असल्याने आपण अहवाल वेळेत सादर होईल, याची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.